# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ )

*महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ*

**डॉ. एस. एम. रोकडे**
संचालक (प्र.)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)
फोन:०७१३२.२२३३२२,२२३३२४ फॅक्स : ०७१३२.२२३३२२
**Email :** bcud.gondwanauniversity@ gmail.com
**web :** gondwana.digitaluniversity.ac , www.unigug.org

क्र/गो.वि./बी.सी.यु.डी./331/2015 दिनांक : 04/09/2015

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :–** चंद्रपूर जिल्हा गॅझेटिअरचे माहिती संकलन
जिल्ह्यातील मृदेविषयी सविस्तर माहिती पाठविणेबाबत.

**संदर्भ :–** मा. कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. १००३ दि. २१.०८.२०१५.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतीक कार्य विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या दार्शनिका विभागाने चंद्रपूर जिल्हा गॅझेटिअरच्या लेखनाचे काम हाती घेतले आहे. या ग्रंथातील कृषी व जलसिंचन या प्रकरणाअंतर्गत जिल्ह्यातील मृदे विषयी सविस्तर माहिती द्यावयाची आहे. त्याकरिता दार्शनिक विभागाने खालील मुद्यांची सविस्तर मुद्येसुद माहिती मागीतलेली आहे.

१. चंद्रपूर जिल्ह्यात आढळणारे मृदेचे प्रकार आणि प्रकारानुसार जमिनीचे क्षेत्र व प्रत्येकी मृदा प्रकाराची सविस्तर वर्णनात्मक माहिती.
२. जमिनीच्या पोतानुसार वर्गीकरण, कोणती मृदा जिल्ह्यातील कोणत्या भागात आढळते त्याची वर्णनात्मक माहिती.
३. आपल्या विद्यापीठाने मृदेच्या वर्गीकरणासंबंधी संशोधन केले असल्यास त्यासंबंधी माहिती.
४. मृदेच्या खोलीनुसार जिल्ह्यातील जमिनीची वर्गवारी.
५. जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये आढळणाऱ्या मृदेच्या विविध प्रकारांसंबंधी विवेचन, त्या त्या प्रकारानुसार जिल्ह्यात घेतली जाणारी खरीप व रब्बी पिकांची माहिती.

उपरोक्त मुद्यांशिवाय विद्यापीठाने मृदेविषयी तयार केलेले संशोधन अहवाल असल्यास तेही सादर करावयाचे आहे. करिता आपण किंवा आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी किंवा कर्मचाऱ्यांकडे याबाबत संशोधन केले असेल तर त्याची माहिती दि. १०.०९.२०१५ पर्यंत या कार्यालयास सादर करावी.

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली (म.रा.)

सहपत्र :– संदर्भ पत्र.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलगुरु चे कार्यालय
आवक क्र. ७५९ दि. ३/०८/१५
जावक क्र. ७५९ दि. ३/०८/१५

सत्यमेव जयते

दर्शनिका विभाग

**GAZETTEERS DEPARTMENT / दर्शनिका विभाग**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA / महाराष्ट्र शासन**


पत्र क्र. - १००३

२७, बरजोरजी भरूचा मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.

ई-मेल : stategazetteer_maharashtra@yahoo.co.in

संकेत स्थळ : http//www.maharashtra.gov.in

दूरध्वनी : २२६७८७७९/२२६९११२४


दिनांक : 21 AUG 2015

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
आवक क्र. 1386 दिनांक 01/8/15
जावक क्र. ........

प्रति,

मा. कुलगुरु,
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली
जि. गडचिरोली

**विषय:- चंद्रपूर जिल्हा गॅझेटिअरचे माहिती संकलन**
**जिल्ह्यातील मृदेविषयी सविस्तर माहिती पाठविणेबाबत.**

महोदय,

जिल्हा गॅझेटिअर हा सर्वंकष माहिती देणारा शासकीय ग्रंथ असून त्यामध्ये जिल्ह्याचा भूगोल, इतिहास, अर्थव्यवस्था, प्रशासन, आर्थिक विकास, लोक व त्यांची संस्कृती, तसेच प्रेक्षणीय स्थळांची माहिती दिलेली असते. दर्शनिका विभाग हा महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आहे. या कार्यालयाने आता चंद्रपूर जिल्हा गॅझेटिअरच्या लेखनाचे काम हाती घेतले आहे. या ग्रंथातील कृषि व जलसिंचन या प्रकरणा अंतर्गत जिल्ह्यातील मृदे विषयी सविस्त माहिती द्यावयाची आहे. तरी खालील नमूद केलेल्या मुद्यांवर सविस्तर मुद्देसूद माहिती आपल्याकडून अपेक्षित आहे:-

१) चंद्रपूर जिल्ह्यात आढळणारे मृदेचे प्रकार आणि प्रकारानुसार जमिनीचे क्षेत्र व प्रत्येकी मृदा प्रकारची सविस्तर वर्णनात्मक माहिती.
२) जमिनीच्या पोतानुसार वर्गीकरण, कोणती मृदा जिल्ह्यातील कोणत्या भागात आढळते त्याची वर्णनात्मक माहिती.
३) आपल्या विद्यापीठाने मृदेच्या वर्गीकरणासंबंधी संशोधन केले असल्यास त्यासंबंधी माहिती.
४) मृदेच्या खोलीनुसार जिल्ह्यातील जमिनीची वर्गवारी
५) जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये आढळणाऱ्या मृदेच्या विविध प्रकारांसंबंधी विवेचन, त्या त्या प्रकारानुसार जिल्ह्यात घेतली जाणारी खरीप व रब्बी पिकांची माहिती.

उपरोक्त मुद्दयांशिवाय आपल्या विद्यापीठाने मृदेविषयी तयार केलेले संशोधन अहवाल असल्यास त्याच्या प्रती पाठविण्याबाबत संबंधीतांना आदेश द्यावेत, ही विनंती.

जिल्हा गॅझेटिअर हा अभ्यासपूर्ण शासकीय ग्रंथ असल्याने त्यात प्रसिद्ध करावयाची माहिती विस्तृत व वस्तूनिष्ठ असावयास हवी ही बाब लक्षात घेऊन माहिती पाठविण्यात यावी.

चंद्रपूर जिल्हा गॅझेटिअरचे काम अग्रक्रमाने पूर्ण करावयाचे असल्यामुळे ही माहिती एक महिन्याच्या आत पाठविण्याची सूचना कृपया संबंधीत विभागास द्यावी.

आपला

कार्यकारी संपादक व सचिव

Khunte/desktop/Research/Phadke/canderpur-4